## उ प सं हा र

बहिणाबाईंचे काव्यलेखन हे मध्ययुगीन कालखंडातील आहे. या कालखंडामध्ये संत साहित्याला विशेष भर आला होता. कथा, किर्तनाद्वारे वेद उपनिषदांचे महत्व, पुराणातील कथा लोकांच्यापर्यंत पोहोचविले जात होते. अशा लोकजागृतीमुळे लोक वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, महानुभाव पंथ इ. पंथाकडे लोक वळत. त्या पंथाची दीक्षा घेत, शिष्यत्व स्वीकारीत. बहिणाबाईंनीसुध्दा विठ्ठलाची कथा, तुकारामांचे अभंग ऐकून वारकरी संप्रदायात प्रवेश केला. इतर कवयित्रीप्रमाणे काव्यरचनासुध्दा केली. परंतु इतर संतकवियित्रीपेक्षा बहिणाबाईंचे वाड.मय वेगळे आहे. त्यांची सामाजिक, कौटुंबिक परिस्थिती इतर संत कवयित्रीपेक्षा वेगळी आहे. महादाइसाने आपल्या पंथाच्या आराध्य दैवतावर आधारित अशी काव्यरचना केली, मुक्ताबाईंचे काव्यरचना निवृत्ती, ज्ञानदेव यांच्या छत्रछायेखाली फुलले, जनाबाईचे काव्यसुध्दा नामदेवांच्या सहवासामध्ये फुलले. वेणाबाईंनी आपल्या काव्यामध्ये पंथाच्या आराध्य दैवताला स्थान दिले. वरील सर्व स्त्रियांनी परमार्थ हा एकमेव मार्ग स्वीकारला होता. त्यांच्या वाट्याला संसारीक जीवन आले नाही.

बहिणाबाईंचा विचार करता त्यांनी संसारामध्ये राहून परमार्थ साधलेला दिसतो. त्यांनी आराध्य दैवतावर काव्य लिहिले. त्याचबरोबर त्यांनी इतरांपेक्षा वेगळा, अभुतपूर्व अशी आत्मनिवेदनपर अभंग रचना केली, आणि निर्याणपर अभंगामध्ये बारा पूर्वजन्माची कथा त्यांनी आपल्या मुलाला सांगितली. आत्मनिवेदनपर अभंग हा वेगळा काव्यप्रकार त्यांनी हाताळला आणि तो विश्वसनीय आहे. बारा पूर्वजन्माची कथा हीसुध्दा विश्वसनीय आहे, कारण काही जन्मकथेमध्ये त्यांनी परिसर, त्यांचे स्वतःचे नांव, आई-वडिलांचे नांव, कुळाचे नांव यांचा नामोल्लेख त्यांनी केला आहे.

तुकारामांच्या प्रभावळीतील संतापेक्षा बहिणाबाई या वेगळया होत्या. तुकारामांचा प्रत्यक्ष गुरूपदेश लाभला नाही तरीसुध्दा स्वप्नसाक्षात्कारातच त्यांनी तुकारामांचे शिष्यत्व स्वीकारले. तुकारामांनी प्रत्यक्षात कोणाला गुरूपदेश दिला नाही किंवा आपणहून कोणाचे शिष्यत्व त्यांनी स्वीकारले नाही. तुकारामांच्या प्रभावळीतील इतर संतापेक्षा बहिणाबाईंचे काव्य वेगळे आहे. त्यांनी तुकारामांच्या काव्याचे अनुकरण केले आहे. इतर सात संतांनी तुकारामांचे वाड.मयीने शिष्यत्व स्वीकारले होते. परंतु त्यांच्या काव्यावर तुकारामांच्या काव्याचा प्रभाव दिसून येत नाही. परंतु बहिणाबाईंनी खऱ्याअर्थाने तुकारामांचे वाड.मयीन शिष्यत्व स्वीकारले होते हे त्यांच्या काव्यावरून दिसून येते. तुकारामांच्याकडूनच त्यांना कवित्व शक्तीचे

वरदान मिळालेले होते. येथे तुकाराम आणि बहिणाबाई यांच्या जीवनात गुरूपदेश आणि काव्यस्फूर्ती या दोन्ही घटनामध्ये या दोघांच्या बाबतीत साम्य आहे. कारण तुकारामांना बाबाजी चैतन्याकडून स्वप्नामध्ये गुरूपदेश मिळाला आणि नामदेवांच्याकडून स्वप्नामध्ये काव्यस्फूर्ती मिळाली.

संत बहिणाबाईंनी अभुतपूर्व असे आत्मनिवेदनपर रचले. त्यांचा चरित्राचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, त्यांनी संसारिक जीवनामध्ये अनेक समस्यांना तोंड देत पारमार्थिकसुध्दा जीवन जगल्या. त्यांच्या जन्माच्यावेळी ब्राह्मणाने भविष्य सांगितले होते की, ही देवलसी भाग्याची आहे. त्याप्रमाणे भविष्य काळात घटनाही त्याचपध्दतीने घडत गेल्या. येणाऱ्या संकटाला धीराने तोंड देत गेल्या. त्यामुळे पतीच्या मनामध्येसुध्दा परिवर्तन झाले. त्यांच्या काव्यातून गुरूनिष्ठा, परखडपणा, फटकळपणा, धार्मिकता, भक्ति, स्त्रीत्व, आत्मपरिक्षण हे गुण दिसून येतात.

संत बहिणाबाईंनी आपल्या काव्यामध्ये वेगवेगळे विषय हाताळलेले आहेत ही एक त्यांची विशेष बाब आहे. त्यांच्या काव्यावर ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, जनाबाई यांच्या काव्याचे संस्कार झाले होते. त्याचबरोबर तुकारामांच्या अभंगाचे संस्कार प्रामुख्याने झाले आहे. एवढेच नव्हेतर त्यांनी काही अभंगामध्ये तुकारामांच्या अभंगाचे अनुवाद केले आहेत. वरील संतकवींनी जे वेगवेगळे विषय हाताळले त्या विषयावर त्यांनी काव्यलेखन केले आहे. पदे–गौळणी–भारूडे, आरत्या, श्लोक, पंढरीमहात्म्यपर, ज्ञानपर, ब्रह्मकर्मपर, झिम्मा, फुगडी, पिंगा, हमामा, भक्तिपर, मनःपर इ. वेगवेगळे काव्यप्रकार, विषय यांचा समावेश त्यांनी केला आहे.

बहिणाबाईंच्या आत्मनिवेदनपर अभंगावरून त्यांच्या लौकिक जीवनावर प्रकाश पडतो, त्याचबरोबर लोकांच्या श्रध्दा, कुटुंबव्यवस्था, विवाहसंस्था–बालविवाह, विषमविवाह, बिजवरांशी विवाह यावर प्रकाश पडतो. जपतप, अनुष्ठान, नवस लोक करत असत. सोन्याची मोहोर, नाणी, गाय याद्वारे आर्थिक व्यवहार चालत असत. लग्नामध्ये हुंडा (आंदण) देण्याचीही पध्दत होती. लोकांच्या समजुतीही वेगळया प्रकारच्या होत्या. स्वप्नावर लोक विश्वास ठेवत असत. जन्मपत्रिकेवरून भविष्य वर्तवले जात असे त्यावर लोक विश्वास ठेवत. बहिणाबाईंच्याबाबतीत अशीच घटना घडली होती. त्यांचेही भविष्य सांगितले होते. बहिणाबाईंच्या काळामध्ये लोक पायी तीर्थयात्रा करत असत. वारकरी लोक पायी पंढरपूरची वारी करत असत. तसेच वेगवेगळया तीर्थस्थळांना लोक देवदर्शनासाठी जात असत. निर्याणपर अभंग हे विश्वसनीय आहेत. कारण बहिणाबाईंनी परिसास स्वतःचे नांव, वडिलांचे नांव दिले आहे. त्याचबरोबर या मताला

पुष्टी देणारे उदाहरण असे की, बहिणाबाईंच्या पतीनी बहिणाबाईंचा त्याग करावयाचे ठरविले असता जयरामस्वामींनी स्वतः येऊन त्यांच्या पतीची कानउघडणी केली आणि सांगितले की, गाय, वासरू, बहिणाबाई यांनी याअगोदरच्या जन्मामध्ये एकत्र अनुष्ठान केले होते. त्यामुळे निर्याणपर अभंगामध्ये जे बारा जन्म वर्णिलेले आहेत ते विश्वसनीय आहेत.

संत बहिणाबाईंनी आपले काव्य प्रभावी होण्यासाठी वेगवेगळया प्रतिमांचा वापर केला आहे. त्यामुळे त्यांचे काव्य श्राव्य झाले आहे. तसेच त्यांनी अलंकार, रस यांचा योग्यरितीने वापर केरून काव्यामध्ये सुरसता आणली, त्यामुळे काव्याला माधुर्य प्राप्त झालेले आहे.

एकूणच बहिणाबाईंच्या चरित्राचा अभ्यास केल्यास हे स्पष्ट होते की, इतर संतकवयित्री आणि तुकारामांच्या प्रभावळीतील संत कवी यांच्यापेक्षा त्यांचे काव्य वेगळे आहे. कारण त्यांनी वेगवेगळे विषय हाताळलेले आहेत. त्यांनी अभुतपूर्व आत्मनिवेदनपर अभंग रचले आहेत. निर्याणपर अभंगामध्ये त्यांनी पूर्वजन्माविषयक माहिती सांगितली आहे. त्यांनी तुकारामांचे वाड.मयीने शिष्यत्व खऱ्याअर्थाने स्वीकारले आहे. प्रत्यक्षात गुरूपदेश झाला नसला तरी त्यांनी तुकारामांच्यावरील भक्ति ढळून दिली नाही. इतर संतकवयित्रींच्या वाट्याला संसारिक जीवन आले नाही परंतु त्यांनी संसारामध्ये राहून परमार्थ साधता येतो हे सिध्द करून दाखविले. हे वेगळेपण बहिणाबाईंच्या चरित्रातून, वाड.मयातून दिसून येते.

बहिणाबाईंच्या अभंगवाणीचा अभ्यास करत असताना मध्ययुगातील काही कवयित्रींचा विचार केला आहे. तुकारामांच्या प्रभावळीतील तुकारामांच्या शिष्याचा अभ्यास केला आहे. बहिणाबाईंचे आत्मचरित्र, निर्याणपर अभंग, त्यांची गुरूपरंपरा, त्यांच्या काव्यावर कोणत्या साहित्याचे संस्कार झाले, त्याच्या काव्यप्रतिमा विशेष आणि शैली विशेष अभ्यास केला आहे. त्यामध्ये अभ्यास म्हणून मला जे भावले ते मी नोंदविले/नमूद केले आहे ते सर्वमान्य होईलच असे नाही. मात्र या ठिकाणी एका निखळ संशोधकाच्या भूमिकेतून 'संत बहिणाबाईंच्या अभंगवाणीचे विशेष' याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

* * *

## परिशिष्ट – 1

प्रबंधिकेमध्ये संदर्भासाठी वापरलेले काही अभंग पुढीलप्रमाणे :

---

### अभंग क्रमांक : 1

आदिनाथे उपदेश पार्वतीसी केला । मच्छेंद्रे ऐकिला मंछगर्भी ।।1।।
शिवहृदयीचा मंत्र पै आगाध । जालासे प्रसिध्द भक्तियोगे ।।2।।
त्याने त्या गोरक्षा केले कृपादान । तेथोनि प्रकट जाण गहेनीप्रती ।।3।।
गहेनीने दया केली निवृत्तीनाथा । बाळपण असता योगरूप ।।4।।
तेथोनी ज्ञानेश पावले प्रसाद । जाले ते प्रसिध्द सिध्दसनी ।।5।।
सच्चिदानंद बाबा भक्तीचा आगर । त्यासी अभयवर ज्ञाने केला ।।6।।
पुढे विश्वंभर शिवरूप सुंदर । तेणे राघवी विचार ठेविलासे ।।7।।
केशव चैतन्य बाबाजी चैतन्य । जालेसे प्रसन्न तुकोबासी ।।8।।
येकनिष्ठ भाव तुकोबाच्या चरणी । म्हणोनी बहेणि लाधलीसे ।।9।।

### अभंग क्रमांक : 3

आऊजी कुलकर्णी लेखक तये स्थळी । तयाचिये कुळी जन्म जाला ।।1।।
माता ते जानकी पिता आऊदेव । देवगाव नाव स्थळ त्याचे ।।2।।
तयाचिये कुळी नाही जी संतान । करी जी संताना काही बाही ।।
लक्षतीर्थी नित्य करूनिया स्नान । शिव अनुष्ठान आरंभिले ।।
कितेक दिवसात जाले स्वप्न तया । माझिया पितया आऊजीसी ।।
होईल संतान कन्या दोन पुत्र । ब्राह्मणे पवित्रे सांगितले ।।
बहेणि म्हणे वरूषा येका मी उत्पन्न । नवमास पूर्ण कन्या जाले ।।7।।

अभंग क्रमांक : 6

मौनस गोत्र माझ्या पित्याचे वरिष्ठ । भ्रतारही श्रेष्ठ गौतम तो ॥1॥
शिवपूर नाम तेथील ज्योतिषी । मायबापे त्यासी समर्पिले ॥2॥
द्वितीय समंधी वरूषा तिसाचा । नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ॥3॥
बहेणि म्हणे त्यासी कन्यादान केले । आनंद दिधले सर्व काही ॥4॥

अभंग क्रमांक : 25

बहुत अंतरी शोक आरंभिला । का मज विठ्ठला मोकलिले ॥1॥
त्रिविध तापाने तापले मी बहू । जाईना का जीऊ प्राण माझा ॥2॥
तव अकस्मात सातवेया दिनी । नामसंकीर्तनी घोषयुक्त ॥3॥
तुकारामरूपे येऊनी प्रत्यक्ष । म्हणे पूर्वपक्ष सांभाळिजे ॥
नको करू चिंता आहे मी तुजपासी । घेई अमृतासी हातीचिया ॥
गाय केले वत्स–मुखी निघे धार । अमृत ते सार सेवी हेची ॥
ठेऊनिया कर मस्तकी बोलिला । मंत्र सांगितला कर्णरंध्री ॥
म्याही पायावरी ठेविले मस्तक । दिधले पुस्तक मंत्र गीता ॥
कार्तिकात वद्य पंचमी रविवार । स्वप्नीचा विचार गुरू–कृपा ॥
आनंदले मन चिद्रुप कौदले । उठोनि बैसले चमत्कारे ॥
मंत्र आठवती तुकोबा स्वरूपे । स्वप्नामाजी कृपा पूर्ण केली ॥
अमृत पाजिले चवी अनारसी । साक्ष ज्याची त्यासी मनामाजी ॥
बहेणि म्हणे ऐसी कृपा सद्‌गुरूची । तुकारामे साची पूर्ण केली ॥13॥

अभंग क्रमांक : 54

महादजी कुलकर्णी तायचिये घरी । असोनि निश्चळी काळक्रमू ॥1॥
येतात हेलावे दुःखाचे अनेक । लक्ष्मीनायक जाणतसे ॥

घालोनी संकट देवावरी भार । असो निर्विकार येकनिष्ठे ।।
तव तये काळी जालिया प्रसूत । कन्या झाली तेथ आपणासी ।।
काशिबाई तिचे ठेवियेले नाव । दाखविला भाव पूर्ण काही ।।
बहेणि म्हणे वत्स मेले कोल्हापूरी । ते आले उदरी ऐसे वाटे ।।6।।

अभंग क्रमांक : 73

विवेक श्रवण करीन वेदांत । साधीन अद्वैत – ब्रह्मनिष्ठा ।।1।।
तुजपुढे बोले पण हाचि मना । तू धरी धारणा आत्मयाची ।।
श्रवणाचे सार्थक मनने होय जाण । निजध्यासी खूण विश्रांतीची ।।
बहेणि म्हणे मना होई तू सुमन । कासया भांडण होय पुढे ।।4।।

अभंग क्रमांक : 81

संताचे वचनी दृढ जया भाव । भक्ति अभिनव हेचि खरी ।।1।।
सांगितली खूण आइके जो मनी । पावले निर्वाणी तोचि एक ।।
संताचे वचन शास्त्राचे आधारे । भक्तिचे निधरि दृढ व्हावे ।।
बहेणि म्हणे संतापायी जया आर्त । हाचि भक्तिपंथ वोळखावा ।।4।।

अभंग क्रमांक : 155

त्रिगुणाचे जाण शरीर वोतले । देही क्रिया चाले गुणापरी ।।1।।
म्हणउनिया साक्षी होय तू गुणाचा । मग तुज केचा द्वेतभाव ।।
त्रिगुणाचे भय ब्रह्मादिका असे । त्रिगुणाचे फासे घातकी हे ।।
त्रिगुण साकळी जीवासी जडली । तयाचेनि जाली बाधकता ।।
त्रिगुणाचा सर्प झौबला जयासी । मरण ते त्यासी आले खरे ।।
बहेणि म्हणे गुण निवारील ऐसे । एक कृपा वसे सद्‌गुरूची ।।6।।

अभंग क्रमांक : 349

शुक वामदेव व्यास परशराम । गेले थोर थोर जेणे पंथे ॥1॥
जेणे पंथे सुखी जाले पै निर्भय । मना तोचि सोय धरी का रे ॥
वसिष्ठ अंबऋषी सनकादिक पाहे । गेले लवलाहे जेणे पंथे ॥
बळी बिभीषण प्रल्हाद वाल्मिक । पावले ते सुख जेणे पंथे ॥
ऐसे किती सांगो चहु वर्णी माझारी । जाले संवसारी सुखरूप ॥
बहेणि म्हणे मना धरी रे धारणा । लागले चरणा निजभावे ॥6॥

अभंग क्रमांक : 215

वृंदावनी केला धावा । म्हणे धाव रे केशवा ॥1॥
द्रोपदीसी पावे हरी । वृंदावनी निर्धारी ॥
वारी सकळ संकट । धन्य तुळसी सर्वा श्रेष्ठ ॥
बहेणि म्हणे सर्व गुण । वृंदावनापासी जाण ॥4॥

अभंग क्रमांक : 294

ब्रह्मभाव देही सदासर्वकाळ । ब्राह्मण केवळ तोचि एक ॥1॥
श्रृति स्मृति साक्ष करोनी बोलिले । नाही म्या ठेविले गुज काही ॥
ब्रह्मीच सर्वदा वर्तती इंद्रिये । ब्राह्मण ती होय याचि अर्थे ॥
बहेणि म्हणे ब्रह्म नांदे तो ब्राह्मण । यातीही प्रमाण नसे तेथे ॥4॥

अभंग क्रमांक : 440

पतिव्रता धर्म एका गे साजणी । धन्या ज्या गर्तिनी पुण्यासीळ ॥1॥

येणेचि श्रवणी मुक्ति होय जीवा । पतीविण देवा नाठविजे ॥
आपणा आपण आळविले जिने । धन्य तेचि जाणे पतिव्रता ॥
प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेंचि गगन झेलियेले ॥
कर्म तेंचि ब्रह्म ब्रह्म तेचि कर्म । ऐसे जिने वर्म जाणियेले ॥
अखंड तो मनी भगवंत सर्वथा । तेचि पतिव्रता निकी लोकी ॥
रागद्वेष मनी जाणिवेचा फुंग । न धरिजे संग अधर्माचा ॥
इंद्रियाच्या वृत्ति विधीने सावरी । न दिसे अंतरी द्वैतभाव ॥
साधुसंत सेवा पतीचे वचन । पाळी तेचि धन्य पतिव्रता ॥
शांतिक्षमादया पाळी भूतकृपा । जाणोनी स्वरूपा पतीचिया ॥
पतीचे वचन अमृता समान । धन्य तिचा जन्म मातापिता ॥
बहेणि म्हणे तिने जिंतिला संसार । वैकुंठीची थार केली तिने ॥12॥

अभंग क्रमांक : 341

आणिका उपदेश सांगे बरव्या रीती । आपण तो चित्ती न धरी काही ॥1॥
ऐसे ते जाणावे मतिमंद हीन । तया ब्रह्मज्ञान काय करी ॥2॥
वरवर लोका सांगे ब्रह्मज्ञान । आपण तैसे जाण न धरी चित्ती ॥
बहेणि म्हणे तया नाही आत्मशुध्दी । येरा सांगे बुध्दी मूर्खपणे ॥4॥

अभंग क्रमांक : 713

मूर्खपणे तुम्हा छळियेले भारी । तरी तू श्रीहरि माय माझी ॥
लेकुरे बोलले काय त्याचा खेद । जननी आल्हाद मानी त्याचा ॥
अपराधाची क्षमा मागता मातेसी । प्रेमपान्हा तिजसी काय नुपजे ॥
बहिणी म्हणे ऐसी गोठी नायकीली । विठाई माऊली तैसी मज तू ॥4॥

अभंग क्रमांक : 510

मागता मागता ज्ञानदेव क्लेश । पावला बावीस जन्म जाले ।।1।।

परी तुझे मन 'देईन' न म्हणे । बहुता बळे तेणे उगवले ।।

चौदा शतके जाली बंदी चांगदेवा । तेव्हा त्वा केशवा फेडी केली ।।4।।

अभंग क्रमांक : 591

टाळ्या–चिपोळ्यांचा ध्वनी आयकता । आनंद हा चित्ता सामावेना ।।1।।

लावियले नेत्र निद्रेत जागृती । तुकाराममूर्ती देखियेली ।।

तुकाराम तंव देखता देखत । आले आकस्मात गुरूरूपे ।।

ठेवियला हस्त मस्तकी बोलून । दिधले वरदान कवित्वाचे ।।

बहेणि म्हणे नेणे स्वप्न की जागृती । इंद्रियाच्या वृत्ती वोसरल्या ।।5।।

अभंग क्रमांक : 726

तूप असे क्षीराआत । साकर उसाच्या रसात ।।1।।

परी पाहिजे हो ज्ञान । वस्तुप्राप्तीचे कारण ।।

सोनयाचे होती नग । पट सूताचे अनेक ।।

अहो काष्टामाजी अग्नी । तिळामाजी तेल जाण ।।

बहिणी म्हणे देही देव । ज्ञानेविण सर्व वाव ।।5।।

अभंग क्रमांक : 484

चुंबक चालवी लोखंडा प्रत्यक्ष । क्लेश हे तयास जेवी नाही ।।1।।

तेवी आत्मा सर्व करोनि अकर्ता । पाहे तू स्वचित्ता वोळखोनि ।।

सूर्याचेनि जेवि भासे मृगजळ । जनक्रिया सकळ सूर्यायोगे ॥
बहेणि म्हणे आत्मा ऐसा जया कळे । तयाचा मावळे जन्ममृत्यू ॥4॥

अभंग क्रमांक : 606

सराफापासी घेतले सोने । न व्हावे कोणे भिडे त्याचे ॥1॥
जोखून पहावे कसोटीसी । घ्यावे कसे आगळे ते ॥
जयाने घेतले त्याचे भिडे । नागवण घडे झाकिलिया ॥
कसी कसोटीच्या आले । जाणावे ते वरच्या मोले ॥
टांकसाळे कसिले नाणे । बहिणी म्हणे तेचि खरे ॥5॥

अभंग क्रमांक : 200

आपले आपण देखिले मरण । तो जाला शकुन खानदेसी ॥1॥
उभारिली गुढी मनाच्या सेवटी । जाली मज भेटी आत्मारामी ॥
केला प्राणायाम सोऽहं धारणेसी । मिळाली ज्योतीशी ज्योती तेणे ॥
सरले संचित आयुष्य देहाचे । क्रियमाण अंतीचे रामरूप ॥
उठति रात्रंदिवस काम क्रोध माया । म्हणती अहा ! अहा ! यमधर्म ॥
वैराग्याच्या श्रेणी लाविल्या शरीरा । ज्ञानाग्नि लाविला ब्रह्मत्वेसी ॥
जाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानीचा ॥
फिरविला घट फोडिला चरणी । महावाक्यध्वनी बोंब झाली ॥
दिली तिलांजली कुळ नाम रूपासी । शरीर ज्याचे त्यासी समर्पिले ॥
बहेणि म्हणे रक्षा जाली त्रिपुरेची । तुकाराम साची कृपा केली ॥10॥

* * *

## परिशिष्ट – 2

### बहिणाबाईंकृत बहुमुखी अभिव्यक्ती प्रकारांची निर्मिती :

---

बहिणाबाईंचे आत्मनिवेदनपर आणि निर्याणपर अभंग प्रसिध्द आहेतच त्याचबरोबर त्यांनी वेगवेगळया विषयावरील तसेच वेगवेगळे काव्यप्रकार आहेत. पाळणा, फुगडी, पिंगा, झिंपा, वगैरे बहुमुखी अभिव्यक्ती प्रकारांची निर्मिती त्यांनी केली आहे.

### * पाळणा *

यशोदा आपल्या बाळाला झोपवण्यासाठी पाळणा म्हणते. परंतु त्यांनी बाहेर त्रिशूळ डमरूधारी शिव आले आहेत असे सांगताच ते बाळ उठून बसते आणि त्रैलोक्यपाळाला पाहण्यासाठी अधीर होतो.

निज रे निज तान्हा बाळा । निज रे जीवींच्या जिव्हाळा ।
निज रे निज कान्हा वेल्हाळा । निज रे निज त्रैलोक्यपाळा ।।धृ.।।
करी धरूनी दोरू । देती स्नेह–झोलू ।
हलवी हळुहळू । यशोदा वेल्हाळा ।।1।।
जो जो जो जो करी त्याते । "हा हा हा हा आला तेथे ।
जोगी", सांगे बालकाते । यशोदा वेल्हाळा ।।2।।
निजासी 'नीज' म्हणे । कोण ते स्वरूप नेणे ।
मायेच्या भुललेपणे । निजवी गोपाळा ।।3।।
हळुहळू पै कर मुखे । हलवी तेणे सुखे ।
रूदना करी तो देखे । गोविंद सावळा ।
म्हणे माता, "अवधारी । जोगी आला बाहेरी ।
त्रिशूळ डमरू करी । दिसतो विशाळ ।।4।।

विभूती लोपन । मस्तकी जट जाण ।
मेघा तिसरा नयन । पाहे गोपाळा ।।6।।
रूंड माळा गळा । व्याघ्रांबर मेखळा ।
मस्तकी झुळझुळा । वाहतसे बाळा ।।7।।
कपाळी अर्धचंद्र । कानी मुद्रा सुंदर ।
न कळे तयाचा पार । ब्रह्मादिकाला ।।8।।
इतुके एकोनी कोनी । बाळ बैसे उठोनी ।
म्हणे "माते नयनी । दाखवी त्याला ।।9।।
काळाचा जो काळ । व्यापक त्रैलोक्यपाळ ।
जोग्याचे दावोनी खुळ । नवल गोपाळा ।।10।।
बहिणी गाई चक्रपाणी । करूनी नाटक वाणी ।
रामकृष्ण स्मरणी । घेती सोहळा ।।11।।

*** फुगडी ***

ज्यांना संसारात अनासक्त होऊन स्वहीत साधावयाचे आहे अशा स्त्रियांना बहिणाबाई फुगडीच्या रूपकाने परमार्थ सांगतात.

फुगडी फू । उघडी हो ।
न होसी घडगी । तरी मग धगडी तू ।।धृ.।।
भूमीवर झाडी । अंतरीचा कामक्रोध काढी ।
सांडी माया ओढी । मग होय भावा गडी ।।1।।
या वासनेचे ओचे । खोवी आधी साचे ।
निरोध इंद्रियाते । मग हरिरंगी नाचे ।।2।।
दोही पदावरी । एक भाव करी ।
अशिपदी वरी । मग तूच पाहे हरी ।।3।।

बध्द सबळ भूजा । आधी सारी ओजा ।
जाण निजगुजा । मग फुगडी घाली ओजा ॥4॥
दृश्य भाव सांडी । एक भाव जोडी ।
प्रेम घाली फुगडी । स्वानंदाची गोडी ॥5॥
ऐसी बहिणी फुगडी घाली । अवघ्या आणिल्या हारी ।
पांगविल्या पोरी । न येती बरोबरी ॥6॥

## * पिंगा *

स्तुती, वाद, मतभेद यांना मान देऊ नका. सर्वत्र समभाव ठेवा. पारमार्थिक पिंगा खेळण्याची अशी कला आहे.

आपली मांडी उघडिता लाज । शिकवितो राग काय तुज ।
न धरिसी सोय काही विवेकाचे गुज ।
न लाजसी तू होता भावा बापाची भाज ॥1॥
घाल पिंगा ऐसा सांगतसे तैसा ।
काया वाचा मने शरण रिघे जगदीशा ॥धृ.॥
इच्छेचिया संगे नको फिरू रानोरान ।
सांडी सांडी अभिमान नाको वाया करू शीण ।
परंपरा हेचि गेले संत आचरून ॥2॥
बहिणी म्हणे पिंगा याची जाण कला एसी ।
साधुनी यावेळी पुढे सिध्दमुनी ऋषी ।
ज्ञानाचे अंग हेची जाण सर्वाविषी ।
तुकाराम कृपे सुखे नांदो अहर्निशी ॥7॥

*** झिंपा ***

पांडुरंगाचे नुसते नाम प्रेमाने घेतले, त्याच्या प्रेमरंगात रंगून नाचले, की तेवढयात पांडुरंग तुमच्यावर कृपा करील, तुमचे सर्व पांग फेडील.

पिटूनिया बाहे गे । नीट उभी राहे ।
बेडकीचे परी तोंड हालविसी पाहे ॥1॥
झिंपा गे झिंपा रामचरण झिंपा ।
विषयाचे गोडी वाया नको करू खेपा ॥धृ.॥
करूणेचे बोल माझे नको करू फोल ।
धरी भक्तिभाव जणे वसे ज्ञानवोल ॥2॥
नाच संतसंगे सखये अति प्रेमरंगे ।
जणे तुज कृपा कीजे प्रीती पांडुरंग ॥3॥
पंढरीचे पेठे सखये सुख आहे मोठे ।
धाऊनीया जाय बाई सर्व पांग फिटे ॥4॥
नका करू फेरे बाई चौऱ्यांशीचे घेरे ।
धरा एकभाव जेणे भव सोडवी रे ॥5॥
मुखी नाम बोले बाई प्रेमभक्ति डोले ।
सुखानंद रसे बाई स्वानुभवे बोले ॥6॥
मध्यमेचे पारी सखये मेळवोनी पोरी ।
सदा अंतरंग खेळा उन्मनीच्या भरी ॥7॥
बहिणी घाली झिंपा । करूनी सद्‌गुरूकृपा ।
संतचरणी विनटली मिळूनी ज्ञानदीपा ॥8॥

*** हमामा ***

तुझे आणि माझे असा भेदभाव करू नका. अहं, सोहं ही वृत्ती मनामध्ये बाळगू नका. तरच

परमेश्वर प्राप्ती होईल.

तुज मज वार । तेथे कोण म्हणे किर ।
ऐके सोसे सरसे मागे का बोलसी फार ॥1॥
हमामा रे पोरा हुंबरी रे । ऐसे करिता किती पांगली रे ॥धृ.॥
अहं सोहं स्वर सारूनी मिळू एक घाई ।
स्वानुभवाचे सुख तेथे सांगू आता काई ॥2॥
क्षरनाक्षर वाजे अनुहात ध्वनी ।
पडिला विसर झाली तन्मयता ध्यानी ॥3॥
बहिणी घाली वार । अवघ्या म्हणविले किर ।
परतली वृत्ती झाली निजानंदी स्थिर ॥4॥

## * वासुदेव *

कर्म केल्यास फळाची अपेक्षा धरू नये. अहंभाव मनी येऊ न द्यावा. आपणास वेदाचे मूळ कळत नसले तरी दानधर्म करावा.

हरी वासुदेव द्वारासी आला ।
कोणी तरी भिक्षा त्यासी घाला गा ॥धृ.॥
कर्म करूनि फळ अल्पवी । अहंभावासी येवू न द्यावे ।
मूळ नसता ते ऋणी त्याचे । सर्व संचित पायी लावा गा ॥1॥
फावे लक्षअलक्ष याही वेगळे । ध्याये ध्यानाहुनी निराळे ।
दृश्य द्रष्टा दर्शन येथे गेले । तेंचि दाता दिले पाहिजे गा ॥2॥
बहिणी म्हणे सरले द्वैत । सच्चिदघन आनंद भरित ।
जेथे वेदांचा न कळे प्रांत । तया दानाचे आम्ही अंकित गा ॥3॥

## * खेळीया *

खेळीयामध्ये बहिणाबाईनी क्षर, अक्षर, त्रिगुणताप, पंचमहाभुते, नवद्वार देह, 25 तत्वे, 16 स्वर, 10 इंद्रिये, 5 विषय, चार पुरूषार्थ व वेद, 7 धातू, 6 शस्त्रे, 18 पुराणे याचा उल्लेख केला आहे.

एका खांबावरी दुखांबाची माडी । तयावरी तीखण आहे ।
तया पाच उभविली घरे । तया नवद्वारे पाहे रे ।।1।।
सांग रे खेळिया याचे नाव कायी । हे कोणी रचिले माझा भाई ।
कोठून झाले कोण यासी व्याले । याचा धनी आहे कवण्या ठायी रे ।।धृ.।।
पंचवीस खांब त्यासी बहात्तर कोठडया । बावन्न खिळे पाही ।
पंधराजण त्यामधी निघ निघ करिती । चौघे राखिती ठाई ठाई रे ।।2।।
सात ही बाजारी दिसती हरी । तेथे घडामोड होते नानापरी ।
साधूनिया चौक चावडी । त्याचे सहा कारभारी ।।3।।
आठरा कोतवाल फिरती दिनराती । अहं ब्रह्मास्त्रि ऐसे जागविती ।
बहिणी म्हणे तेथे ओंकार ध्वनी । उठोनी कोठे सामावते ।।4।।

## * दादल्या *

दादल्यामध्ये बहिणाबाईनी मायेने प्रपंच रचला तो दादुला जे परब्रह्म त्याला माळ घालूनच. हा हरीच या सृष्टीचा मुख्य आहे.

त्रिकुट शिखरी नांदे एक नारी । त्रिभुवन तिचे उदरी ।
नातू पणतू हरिहर ब्रह्मादिक । ते पुरषेविण नांदे घरी ।।1।।
नवल सांगता नये । ते दादुल्यासी म्हणे बाप माये ।
शेखी बापासीच माळ घालून तिने । प्रपंच रचला आहे ।।धृ.।।

वांझीच ते व्याली बाळ । तियेपासून तिन्ही बाळ ।
उत्पत्तिस्थितिप्रलयमयी । आपली आपण खाय बाळ ।।2।।
पाहता शेंडा ना मूळ । परि तिचेच येवढे खेळ ।
एकाचे पंचवीस करून । तिने रचिले ब्रह्मांड गोळ ।।3।।
वाषाची लेकीच नवल । व्याली कैसे जगी ।
ऐसे जाणून खेळू खेळ । कैसा तोचि एक जाणिजे भोगी (योगी) ।।4।।
ऐसी ते नारी वर्ते एक चराचरी । कळे तियेची थोरी ।
बहिणी म्हणे ते अगम्य सर्वा । आहे तुम्हा आम्हा माझा हरी ।।5।।

### * डोहो *

निजभाव मनी धरूनी भक्तिचा अंगीकार करावा, सतत परमेश्वराचे मनन, चिंतन करावे त्यामुळे साक्षात्कार होतो.

डोहो रे कान्हा डोहो ।।धृ.।।
निजभाव धरी डोहो । भक्ती अंगिकारी डोहो ।
होई निर्विकारी डोहो । कल्पना वारी डोहो ।।1।।
श्रवण करी डोहो । मनन धरी डोहो ।
निजध्यास विवर डोहो । तोचि धरी हे साक्षात्कारी डोहो ।।2।।
डोहो डोहो डोहो डोहो । डोहो घालिता जडला भावे ।
बहिणीसी फावला प्रेमभावो । तुकाराम स्मरणे हाची लाहो ।।3।।

### * सौरी *

पैशासाठी न फिरता परमेश्वरप्राप्तीसाठी चारी दिशांना फिरू त्यामुळे रामराज्यच या जगामध्ये नांदेल.

कुडपियला देस आता नका करू बळ ।
झाले रामराज्य तुमचे वोसरले बोल ।।धृ.।।
धरा बाई लाज काही म्हणा रामराम ।
साहेबाचे देणे तेणे झाले पूर्ण काम ।।1।।
साहेबाचे देणे तेणे मोकळे केले आम्हा ।
गुरूकृपा जाणती संत काय कळे तुम्हा ।।2।।
रूक्यासाठी फोडू डोई हिजडी नाम आम्हा ।
निजभावाचा घेऊनी डौर हिंडू चारीधामा ।।3।।
जाति कर्म कुळ नाही सौरियेच्या वेषा ।
बहिणी म्हणे नि:शकपणे हिंडो दाही दिशा ।।8।।

## * मुंढा *

बहिणाबाई मुंढामध्ये सांगतात की, वासनेचा त्याग करून आत्मज्ञान शोधावे.

मुंढा तोचि मुंढा अवघा लुंडा करी इंद्रियांचा ।
मन जिंकोन करील त्याग अवघा वासनेचा ।।1।।
तरीच बरोबरी होईल समसरी ।
नाही तरी जाय अधोमुख करी ।।2।।
मनपणी मना कोठे घेऊनिया वाव ।
पूर्णपणी पाही अवघा आत्मदेव ।।3।।
सुखस्थिती अनुभव विज्ञानेसी लाहे ।
बहिणी तोचि मुंढा अंतर्बाह्य पाहे ।।4।।

## * सोंग *

संन्याशाचे सोंग घेऊन पोट भरणारे लोकांना फसवितात. ज्याने स्वरूप जाणले तोच खरा संन्यासी.

सोंगसंपादणी केली आश्रमाची । नाही स्वरूपाची खूण–मुद्रा ।।1।।
ठकवूनी जना भरितसे पोट । मनी नाही वीट वासनेचा ।।2।।
बहिणी म्हणे कैसे केले जन वेडे । दावी सोंग कुडे पोट भरी ।।3।।

## * भाट *

नंदजी आसिस भाट भट भाटको आसिस है ।
चिरकाल सुत तेरा । सत्य जाण बात है ।
गज दासी घोडे । वस्त्र शस्त्र दान देत है ।
कृष्णको प्रताप भाट । बहिणी मूसे गात है ।

## * प्रार्थना *

उठ सत्वर विठ्ठला । भेट देई रे आम्हाला ।
वाट पाहती सकळा । सखिया तटस्थ नयनी ।।1।।
वाटसी नयनी पहावा । जन्मोजन्मी विठ्ठल व्हावा ।
म्हणोनी वाट पाहाती भावा । भेटी देरे रे विठ्ठला ।।2।।
नयन आर थोर आहे । कै भेटेल विठ्ठल माये ।
काया बहुत इच्छित पाहे । क्षेम दे रे झडकरी ।।3।।
हात ठेवोनिया कटी । कै हा देखेन विठ्ठल दिठी ।
डोळेभरी जगजेठी । हृदय पेटी साठवीन ।।4।।
विठ्ठल जपता मानसी । (अपूर्ण)

## परिशिष्ट - 3


### बहिणाबाईची पत्रिका आणि वंशवृक्ष

---

'विरेश्वर ज्योतिषाने पत्रिका केली व भविष्य वर्तवले' असे त्या स्वतःच म्हणतात. परंतु त्यांनी जन्मतिथी व वेळ दिलेली नाही. त्यांच्या मुलाने मृत्यूतिथी सांगितली पण वेळ सांगितली नाही. कुंडली तयार करण्यास जन्मस्थान, तिथी व वेळ आवश्यक असतात. बहिणाबाईंनी जन्मगाव फक्त सांगितले आहे. त्यामुळे त्यांच्या निर्याणपर अभंगावरून जन्मदिवस सांगता येईल. त्यांचे निर्याण अश्विन शुध्द प्रतिपदा बुधवार शके 1622 या दिवशी झाले.

'बहात्तरी वरूषे आयुष्यमर्यादा । आजी जाली सिध्दासनी पूर्ण ॥' म्हणजे त्यांचा जन्म (शके 1622 उणे 72 वर्षे म्हणजे) भाद्रपद वद्य 14 शके 1550 चे मध्यान्हापर्यंत झाला असे निश्चित ठरते.

वरील जन्म वेळेप्रमाणे ज्योतिषाचार्य श्री. दत्तात्रेय कृष्णराव सुळे, मुंबई यांनी तयार केलेली सायनभाव चलीत कुंडली.




1) बऱ्याच वयाने तफावत असणाऱ्या पुरूषाबरोबर विवाह.

2) तीन वर्षानंतर शुभयोग (बहिणाबाईंच्या वयाच्या तिसऱ्या वर्षी बंधूचा जन्म)


3) वयाच्या आठव्या वर्षी स्थलपरिवर्तन (गाव सोडून जावे लागले)

4) नवव्या वर्षी धार्मिक स्थळांची यात्रा (पायी तीर्थाटन)

5) बाराव्या वर्षानंतर मानवजातीच्या पाशाऐवजी पशुंचे उत्पन्न होईल. (गाय व वत्साचा लाभ झाला त्यावेळी बहिणाबाईंचे वय वर्षे आठरा)

6) भाग्ययोग (त्यांना गुरूपदेश झाला)

**निरयन जन्मलग्न कुंडली**




महत्वाचे योग : 1) अध्यात्म, धर्मकारक गुरू लग्नस्थानी 2) लग्नेश बुध पंचम स्थायी 3) बुध नेपच्यून युती पंचम स्थानी व वायू तत्वाच्या राशीत 4) गुरू–बुधाचा नवपंचमयोग लग्न व पंचम स्थानातून बुध्दीकारक बुध विद्या स्थानी व बुध्दीप्रधान (वायु तत्व) राशीमध्ये 5) चंद्र शनीचा नवपंचम योग 6)सूर्य हर्षल युती चतुर्थ स्थानी 7) नवव्या स्थानावर पंचमेश शुक्राची व नैसर्गिक शुभग्रह गुरूची दृष्टि आहे. ह्यामुळे त्या संत झाल्या.

वरील कुंडलीतील ग्रहांचे वर्णन आणि बहिणाबाईंच्या जीवनातील घटना यांचे साम्य आहे. त्यामुळे या कुंडलीवर विश्वास ठेवण्यास काहीच हरकत नाही.

* * *

## संत बहेणाबाईंच्या माहेरचे वंशज

(अ) कै. श्री. रंगनाथ रघुनाथबाबा कुलकर्णी

- कै. श्री. बाळकृष्ण रंगनाथ
- कै. श्री. प्रल्हादराव रंगनाथ
  - (१) श्री. रघुनाथ (लक्ष्मणराव) प्रल्हादराव
- श्री. दिगंबरराव रंगनाथ
  - (१) त्र्यंबकराव दिगंबरराव

---

(ब) कै. श्री. नीळकंठराव जयवंतराव कुलकर्णी

(१) श्री. गोपाळराव कुलकर्णी–पत्नी अनसूया


- श्री. शंकर (ऊर्फ बापू)–सुमन (शिक्षक)
  - प्रकाश–सुलभा
  - सौ. सविता उदय देऊळगावकर
  - सौ. चित्रा रवींद्र कोराणे
  - उषा
  - सुनीता
- श्री. सुधाकर–आशालता (चिटणीस)
  - राजेंद्र
  - विजय
  - संगीता
  - लक्ष्मीकांत
  - उमाकांत
- श्री. अरविंद–सुशीला (शेती व्यवसाय)
  - संदीप
  - अतुल
  - वैशाली
- श्री. सिताराम–शकुंतला (भिक्षुकी व्यवसाय)
  - वनिता
  - अर्चना
  - मंजुषा
  - प्रशांत
  - बहेणा–मुक्ता (जुळ्या)
- सौ. सिंधु श्यामराव सोले
- सौ. पुष्पा पुरुषोत्तम डबाळकर

---

वरीलप्रमाणे सध्याच्या वंशजांचा वंशवृक्ष श्री. बापुगुरुजी (शंकर गोपाळराव कुलकर्णी) यांनी पाठविला आहे. ते आपल्या पत्रात (दि. २६–१२–१९८७) पुढे लिहितात–आमची ही १७ वी पिढी आहे असा अंदाज केला जातो. आम्ही सत्तावीस कुटुंबीय माणसे एकत्रच नांदत आहोत. शेती चाळीस एकर जमीन आहे. संपन्न कौटुंबिक जीवन जगत आहोत. बहेणाबाईंच्या वेळचाच जुना वाडा आहे. घराशेजारी महादेवाचे मंदिर आहे व मळ्यातही महादेवाचे देऊळ आहे.

संत बहिणाबाईंचा गाथा,
संपा. शालिनी जावडेकर यांचे सौजन्याने

## संत बहेणाबाई पाठक यांच्या घराण्याचा वंशवृक्ष




टीप :– हा वंशवृक्ष पं. ज्योतिषाचार्य अशोकशास्त्री शोचे, त्र्यंबकेश्वरचे पुरोहित यांचेकडून आयुर्वेदाचार्य सीतारामशास्त्री जोशी शिऊरकर, यांनी श्री. मधुकरराव पाठक यांचे प्रेरणेने व मदतीने संग्रहित केला.

* पाठक हे मूळचे उपनाव (आडनाव) आहे. गाईंचा मोठा प्रतिपाळ त्यांच्याकडे होता. म्हणून त्यांना पाठक–गोस्वामी म्हणू लागले. गोस्वामीचा अपभ्रंश गोसावी झालेला आहे. घराणे मूळचे शाक्त सांप्रदायिक.

△ भवानी हे पुरुषाचे नाव आहे.

संत बहिणाबाईंचा गाथा,
संपा. शालिनी जावडेकर यांचे सौजन्याने

## परिशिष्ट – 4

### 'संत बहिणाबाई' चित्रपटाची माहिती

---

1) निर्माता – विश्वकला मंदिर
2) पटकथा – श्री. व्यंकटेश माडगुळकर (इ.स. 1948)
3) पदे – राजा बढे
4) कलावंत – बेबी शकुंतला, राजा पंडित, ललिता पवार, जयराम शिलेदार, विवेक, सुधा आपटे, शंकर कुलकर्णी वगैरे.
5) रंगभूषा – सि.ह. मराठे
6) कला – आचरेकर
7) छाया – कुमार जयवंत, कोरगावकर
8) ध्वनी – चिंतामणराव मोडक
9) पद्ममुद्रण – बी.एन्. शर्मा
10) नृत्य – बद्री प्रसाद
11) संगीत – स्नेहल भाटकर
12) पार्श्वगीते – लता मंगेशकर, आशा भोसले, जयमाला शिलेदार, आर्.एन्. पराडकर
13) दिग्दर्शक – जुन्नरकर
14) संकलन – सोना पाठारे
15) निर्मिती स्थळ – जागृती स्टुडिओ, चेंबूर
16) चित्रमंदिर – सेंट्रल (मुंबई)
17) प्रकाशन – 10–07–1953
18) लांबी – 13674 फूट

* * *

## परिशिष्ट – 5

### बहिणाबाई पुण्यतिथी महोत्सव व दिंड्या

---

देवगाव येथे बहिणाबाई महोत्सवाचा कार्यक्रम 1967 पासून श्री संत शंकरस्वामी महाराज, शिऊर फडावरील वारकरी मंडळी व किसन महाराज चिगटगावकर यांच्या प्रेरणेने देवगाव येथे पुण्यतिथीचा उत्सव सुरू केला आहे. सात–आठ वर्षानंतर 'अखंड हरिनाम सप्ताहाचा' कार्यक्रम सुरू केला आहे. या सप्ताहात श्री ज्ञानेश्वर पारायण, बहिणाबाईंच्या गाथ्याचे पारायण, प्रवचने, कीर्तन, भजन, हरिपाठ इ. कार्यक्रम केले जातात.

शिऊर येथे 'श्री संत बहिणाबाई वारकरी सेवा मंडळ' शिऊर व परिसर या नावाने मंडळ असून दरवर्षी भाद्रपद वद्य नवमी ते अश्विन शुध्द प्रतिपदा असा सत्पाह साजरा करतात. यात संत बहिणाबाईंचा जन्म दिवस भाद्रपद वद्य त्रयोदशी व निर्याण दिवस अश्विन शुध्द प्रतिपदा हे दोन्ही साजरे करतात. शिऊर येथे हा उत्सव ह.भ.प. काशिनाथ महाराज मोगल यांनी 1981 साली सुरू केला तो आजतागायत चालवित आहेत.

सो. शालिनी अनंत जावडेकर यांनी 1973 पासून बडोदा येथे पुण्यतिथीचा कार्यक्रम करतात.

देवगावमध्ये इ.स. 4–8–1968 साली बहिणाबाईंच्या पादुकांची स्थापना झाली आणि 1972 साली देवगावहून दिंडी सुरू झाली.

पंढरपूर – आषाढी वारीच्या 15 दिवस अगोदर देवगावहून दिंडी पंढरपूरास निघते.

आळंदी – कार्तिक एकादशीपूर्वी 15 दिवस निघून देवगावहून आळंदीस दिंडी जाते.

देवगाव प्रमाणेच श्री. मोगल यांनी शिऊरहून दिंड्या सुरु केल्या आहेत.

* * *

## परिशिष्ट - 6

### बहिणाबाईंची अमृतवचने

---

1) काय करावी वाराणसी । मातापितर हेंचि काशी ।।

2) करी मातापिता सेवा । तेथे वास सदा देवा ।।

3) मातापिता आणि सद्गुरू । त्यासी नाठविता पातकी ती ।।

4) सतशास्त्रश्रवण सत्संगसेवन । देव तयाहूनि आणीक नाही ।।

5) भजनापाशी नित्य धावे । वराडिया ऐसा देव ।।

6) भूतकृपा असे सर्वब्रह्म वसे । भक्ति अभिनव तचि खरी ।।

7) बहिणी म्हणे स्थिरबुध्दी । हेंचि अखंड समाधि ।।

8) आत्माज्ञाना ऐसे कोण तीर्थ दुजे । ज्ञानिया उमजे पूर्वपुण्ये ।।

9) नामधन जया गाठी । तोचि कोटीनारायण ।।

10) तोचि जाण छत्रपती । ध्यास चित्ती विठोबाचा ।।

11) सर्व तीर्थाचे माहेर । आहे तुलसी साचार ।।

12) बहेणि म्हणे वृंदावन । कलियुगी मुक्तिस्थान ।।

13) प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेच गगन झेलियेले ।।

14) जन हेचि जनार्दन । ऐसे श्रुतीचे वचन ।।

15) वासनेच्या क्षये मोक्ष तो सापडे ।।

16) बहेणि म्हणे नाम जपावे सर्वदा । येणे परमपदा पावसीले ।।

17) बहेणि म्हणे जन निंदोत सकळ । आत्मत्वी निश्चल ठेवी मन ।।

18) कसी कसोटीच्या आले । जाणावे ते वरच्या मोले ।।

19) टांकसाळी कसिले नाणे । बहिणी म्हणे तेची खरे ।।

20) बहेणि म्हणे निंदक देखे जेंव्हा डोळा । आनंद सोहळा करीतसे ।।

21) निंदके निंदिता कर्ताकर्म जळे । आम्हासी आकळे परब्रह्म ।।

22) वेदासि विरूध्द नव्हे तो परमार्थ ।।

23) बहेणि म्हणे वृत्ति जै पावले निवृत्ति । विषय तेव्हा होती ब्रह्मरूप ।।

24) बहेणि म्हणे भाव तोचि आम्हा देव । नाही या संदेह अणूमात्र ।।

25) राखोनी आपणासी तारी दुजियासी । बहेणि म्हणे त्यासी मोल नाही ।।


26) संताचे वचनी दृढ जया भाव । भक्ति अभिनव तेचि खरी ।।

27) प्रपंचभिमुख मानस सर्वदा । दक्षिण प्रसिध्दा तेचि जाण ।।

28) प्रपंची विन्मुख जालियाने चित्त । उत्तरायण सत्य तेचि आम्हा ।।

* * *

परिशिष्ट – 7



खुण वंगिन्क्ष्याचनिद्राण ५ ६५
संतकृपाजाली ईमारतफळाआली
१ ज्ञानदेवेघातलापाया उभारिले
देवालया २ नामातयाचाकिंकर त
णेरचिलेआवार ३ जनार्दनयेकना
थ खांबदिल्हाभागवत ४ तुकाजा
लासेकळस भजनकरासावकास ५
बहेणिफडकतिध्वजा निरोपणके
लेवोजा ६ ६६
मरणनयाह्मणतोरेनरमरणनया
ह्मणतो स्वानुभविकसुखतोहिज
यासीविषईजोरमतो १ स्त्रिसुत
धनदुहितापीयजपासीभ्रमरजपा
भ्रमतो आवडिमानप्रतिष्ठालोका
कयेथचिजोरमतो २ राज्यसुखी
रतिआर्तमुर्छनाकाभिलुब्धकतो
जोव्यसनिप्रियमद्यपरस्त्रिलंपट
तामसतो ३ वाधिनंउद्रपदिभ्रम

**शिऊर येथील हस्तलिखिताच्या एका पृष्ठाचे छायाचित्र.**

संत बहिणाबाईंच्या आशा, संघा शालिनी
आवडेकर यांचे सौजन्याने

## संदर्भ ग्रंथसूची


1) इर्लेकर सुहासिनी, तुकारामांची प्रभावळ, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, इ.स. 1992
2) इनामदार हे.वि., अनुभव तुकोबाचा, पुणे प्रथमावृत्ती
3) चित्रे दिलीप, पुन्हा तुकाराम, पुणे प्रथमावृत्ती
4) जावडेकर शालिनी, संत बहिणाबाईच्या गाथा, पुणे दुसरी आवृत्ती, इ.स. 1989
5) जाधव रा.ग., आनंदाचा डोह, पुणे दुसरी आवृत्ती
6) जोशी प्र.न., मराठी वाड.मयाचा विवेचक इतिहास, प्रथम आवृत्ती, इ.स. 1972
7) जोशी प्र.न., मराठी वाड.मयाचा इतिहास
8) डॉ. देशपांडे अ.ना., प्राचीन मराठी वाड.मयाचा इतिहास
9) तुळपुळे शं.गो., पाच संतकवी, पुणे, पाचवी आवृत्ती
10) देवडीकर बाबुराव, संत तुकारामांची सांप्रदायिक गाथा
11) नासिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाड.मयाचा इतिहास, कोल्हापूर पाचवी आवृत्ती, इ.स. 1994
12) पांगारकर ल.रा., श्री संत तुकारामांच्या गाथा, पुणे 1971
13) पांगारकर ल.रा., प्राचीन मराठी वाड.मयाचा इतिहास, खंड 1
14) पांगारकर ल.रा., मराठी वाड.मयाचा इतिहास, खंड 2
15) पांगारकर ल.रा., मराठी वाड.मयाचा इतिहास, खंड 3
16) बेंद्रे वा.सी., संत तुकाराम, 1963
17) मालशे स.ग., मराठी वाड.मयाचा इतिहास, खंड 2 (भाग 2), पुणे प्रथमावृत्ती, इ.स. 1982
18) शेणोलीकर ह.श्री., प्राचीन मराठी वाड.मयाचे स्वरूप, कोल्हापूर, 1971
19) शेवडे इंदूमती, संत कवयित्री, मुंबई प्रथमावृत्ती


* * *